आरोग्य विभाग ,यवतमाळ.

(महाराष्ट्र शासन)

वैद्यकीय अधिकारी गट -अ ची पदे भरण्यासाठी जाहीरात.

जाहीरात क्र 02/2017 जा.क्र/पदभ/यजिप/आरोग्य/स्था-3/२८६७-६९/2017 दि-२९/८/२०१७

1.यवतमाळ जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत आरोग्य संस्थामध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावरील भरती करीता पात्र उमेदवाराकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

2. संस्थामध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावर सरळ सेवेने पदभरती करण्यासाठी **yavatmal.nic.in** व **zpyavatmal.gov.in** या संकेतस्थळामार्फत अर्जाचा नमुना उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

3.विस्तृत जाहीरात **yavatmal.nic.in** व **zpyavatmal.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.उपरोक्त नमुद पदासाठी अर्ज करु इच्छीणा-या उमेदवारांनी वेतनश्रेणी पात्रता,वयोमर्यादा,अर्ज शुल्क,सुचना,निवडीचे निकष इत्यादी तपशिलासाठी सदर संकेतस्थळाला भेट द्यावी.उमेदवारांनी अर्जाचा नमुना डाऊनलोड करुन संपुर्णतः भरुन सादर केलेला अर्ज मुळ प्रतिज्ञा पत्र व आवश्यक त्या सांक्षाकित प्रतीसह जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.यवतमाळ भावे मंगल कार्यालयासमोर,यवतमाळ येथे दि. ११/09/2017 रोजी सायंकाळी 5.45 वाजेपर्यंत सादर करावे.

रिक्त पदांची यादी खालील प्रमाणे आहे

| अ.क. | तालुका | प्रा.आ.केंद्राचे नाव | रिक्त पदे | ग्रामिण रूग्णालये | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | यवतमाळ | बेलोरा | 1 | | |
| 2 | यवतमाळ | वडगाव पो.स्टे. | 1 | | |
| | पांढरकवडा | खैरगाव | 1 | ग्रा. रू. करंजी 1,/उजीरू पांढरकवडा 1/बंधपत्रीत 1 /ट्रामा केअर युनीट पांढरकवडा 1 | 4 |
| 3 | घाटंजी | पारवा | 2 | ग्रा.रू. घाटंजी | 1 |
| 4 | घाटंजी | भांबोरा | 1 | | |
| 5 | घाटंजी | शिवणी | 1 | | |
| 6 | राळेगाव | दहेगाव | 1 | ग्रा.रू राळेगाव | 1 |
| 7 | राळेगाव | धानोरा | 1 | | |
| 8 | झरीजामनी | झरीजामनी | 1 | | |
| 9 | झरीजामनी | मुकुटबन | 1 | | |
| 10 | वणी | शिरपुर | 1 | ग्रा.रू. वणी | 1 |
| 11 | वणी | कायर | 1 | | |
| 12 | दारव्हा | मांगकीन्ही | 1 | उ.जी.रू. दारव्हा 2/ग्रा.रू. लोही 2 | 4 |
| 13 | दारव्हा | बोरी अरब | 1 | | |
| 14 | आर्णी | सदोबासावळी | 1 | ग्रा.रू. आर्णी | 1 |
| 15 | महागाव | काळीदौलत | 1 | | |
| 16 | उमरखेड | ढाणकी | 1 | | |
| 17 | उमरखेड | सोनदाभी | 1 | | |
| 18 | नेर | | | ग्रा.रू नेर | 2 |
| 19 | बाभुळगाव | | | ग्रा.रू. बाभुळगाव | 2 |
| 20 | दिग्रस | | | ग्रा.रू. दिग्रस 2/नगर परिषद 1 | 3 |
| 21 | मारेगाव | | | ग्रा.रू. मारेगाव | 3 |
| 22 | कळंब | | | ग्रा.रू. कळंब | 1 |
| | एकुण | | 19 | | 23 |

एकुण वैद्यकीय अधिकारी गट -अ (एम.बी.बी.एस) ची रिक्त पदे 19 + 23 = 42 पदे

वर नमूद केलेल्या पदसंख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

अटी व शर्तीः-

1. यवतमाळ जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत आरोग्य संस्थामध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावरील भरती करीता पात्र उमेदवाराकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.
2. संस्थामध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावर सरळ सेवेने पदभरती करण्यासाठी yavatmal.nic.in व zpyavatmal.gov.in या संकेतस्थळामार्फत अर्जाचा नमुना उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
3. उमेदवारांनी अर्जाचा नमुना डाऊनलोड करुन संबधित जिल्हयाच्या जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ येथे स्वहस्ते /नोंदणीकृत डाकेने सादर करावा..
4. वेतनश्रेणीः- 15600-39100 अधिक ग्रेड वेतन रु.5400 व इतर अनुज्ञेय भत्ते शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.मवैअ-2011/प्रक्र-776/सेवा-3 दिनांक 14 डिसेंबर 2011 अन्वये पदव्युत्तर पदविका धारक उमेदवारांना 3 अतिरीक्त वेतनवाढी व पदव्युत्तर पदवी धारक उमेदवारांना 6 अतिरीक्त वेतनवाढी अनुज्ञेय राहतील.त्यामुळे विशेषज्ञ वैद्यकीय अधिका-याचे वेतन एमबीबीएस अर्हताधारक वैद्यकीय अधिका-यांपेक्षा जास्त असेल.

4.वय -

4. (1) जाहीरात प्रसिध्दीच्या दिनांक ३०/०८/२०१७ रोजी उमेदवाराचे वय ३८ पेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारांचे बाबतीत नियमाप्रमाणे शिथीलक्षम.

4.(2) शासकिय वैद्यकीय सेवेत स्थायी/अस्थायी/बंधपत्रीत स्वरुपात कार्यरत असणा-या उमेदवाराच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा जास्तीत जास्त 5 वर्षापर्यंत शिथील करण्यात येईल.

4. (3)शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.म.वै.अ-२०११/प्रक्र745/11/सेवा-3 दि.३० ऑक्टोंबर 2013 या मधील नमुद विषयतज्ञ शाखेतील असाधारण किंवा अतिविशेषज्ञ शैक्षणिक अर्हताधारक केलेले उमेदवारांच्या बाबत कमाल वयोमर्यादा जास्तीत जास्त 10 वर्षापर्यंत शिथील करण्यात येईल.

5.शैक्षणिक अर्हता ::-

5.(1) वैद्यकीय अधिकारी(एम.बी.बी.एस) पदासाठी संविधानिक विद्यापीठाची एम.बी.बी.एस पदवी कींवा भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम 1956 (1956 च्या 102) ला जोडलेल्या प्रथम किंवा व्दितीय अनुसुचित विनीर्दीष्ट केलेली अन्य कोणतीही अर्हता.

5.(2) वैद्यकीय अधिकारी (विशेष तज्ञ) पदासाठीः- संविधानिक विद्यापीठाची बालरोगचिकीत्सा किंवा शल्यचिकीत्सा किंवा औषधवैद्यक किंवा स्त्रीरोग किंवा बधिरीकरण किंवा मनोविकृत शास्त्र किंवा नेत्रशल्यचिकीत्सा किंवा क्षकिरण शास्त्र किंवा विकृतीशास्त्र किंवा अणु जिव शास्त्र किंवा शरीर किंवा रक्त संक्रमण या विशेषज्ञ शाखेतील भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम १९५६ (१९५६ च्या १०२) ला जोडलेल्या प्रथम किंवा व्दीतीय अनुसुचित विनिर्दीष्ट केलेल्या शाखेतील पदव्युत्तर पदविका किंवा पदवी.

5.(3) /08/2017 या दिनांकापुर्वी अथवा दिनांकास आंतरवासिता (Internship) पुर्ण असणारे उमेदवारच पात्र ठरतील.

5.(4) शुध्द आयुर्वेद/बी.ए.एम.एस.शैक्षणिक अर्हताधारक उमेदवारांनी या पदासाठी अर्ज करु नये